# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

राहुरी - ४१३ ७२२, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र)

## मार्च २०२६

# ई वार्ता




मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र.२९५०/२०२६

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

मार्च २०२६



## महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा ३९ वा पदवीप्रदान समारंभ संपन्न












**दि. १५ मार्च, २०२६.** राहुरी येथील महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या ३९ व्या पदवीप्रदान समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल तथा महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलपती श्री. जिष्णु देव वर्मा हे होते. यावेळी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस, विधानपरिषदेचे सभापती मा.ना.श्री. राम शिंदे, महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना.डॉ. राधाकृष्ण विखे पाटील आणि कृषि मंत्री तथा कृषि विद्यापीठाचे प्रतिकुलपती मा.ना.श्री. दत्तात्रय भरणे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून नवी दिल्ली येथील भाकृअप–भारतीय कृषि संशोधन संस्थेचे माजी संचालक आणि भाकृअप–भाकृसंसं अनुवंशशास्त्र विभागाचे मानद शास्त्रज्ञ डॉ. अशोक कुमार सिंग उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. इंद्र मणी, अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख, नागपूर येथील म्हाफसूचे मा. कुलगुरु डॉ. नितीन पाटील, कुलसचिव श्री. राजेंद्रकुमार पाटील, राज्यपालांचे खाजगी सचिव श्री. पवनसिंग, ए.डी.सी. श्री. अभयसिंग देशमुख, मुख्यमंत्र्याचे ओ.एस.डी. श्री. दिलीप राजुरकर, कार्यकारी परिषद सदस्य मा. श्री. दत्तात्रय उगले, मा. श्री. जी. मल्लीकार्जुन, मा. डॉ. शिल्पा प्रतापसिंह पाटील, मा.डॉ. के. सामी रेड्डी, मा.आ.श्री. हेमंत ओगले, विद्या परिषद सदस्य मा.श्री. राजेंद्र पवार, मा.डॉ. के.ई. लवांडे, मा.डॉ. पी.एन. रसाळ, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, नियंत्रक श्री. सदाशीव पाटील आणि विद्या शाखेच्या उपकुलसचिव श्रीमती स्वाती निकम उपस्थित होते.

राज्यपाल श्री. जिष्णु देव वर्मा मार्गदर्शन करतांना म्हणाले की विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग शेतकरी व ग्रामीण समाजाच्या विकासासाठी करावा. तसेच नवोन्मेष, उद्योजकता आणि तंत्रज्ञानाधिष्ठित उपायांच्या माध्यमातून शाश्वत कृषि विकास साधावा. कृषिचे पदवीधर विविध आव्हानांना सामोरे जात शाश्वत कृषि विकासाचा मार्ग दाखवतील, असा मला विश्वास आहे. मी विद्यार्थ्यांना नवोन्मेष, उद्योजकता आणि समाजाभिमुख कार्याचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन करतो. भारतीय कृषिचे भविष्य तंत्रज्ञानाधिष्ठित उपाय, स्टार्ट–अप्स,

वर्ष :६, अंक क्रं. : ६३, मार्च, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

कृषि उद्योग व्यवस्थापन आणि शाश्वत शेती पद्धतींमध्ये दडलेले आहे. आपल्या शिक्षणाचा उपयोग केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी नव्हे, तर ग्रामीण समाज उन्नतीसाठी व्हावा. १९६९ साली स्थापन झालेल्या या विद्यापीठाने मागील पाच दशकांत कृषि विकासात महत्त्वपूर्ण कामगिरी केली असून सुमारे १.५ लाखांहून अधिक कुशल मनुष्यबळ घडविले आहे. विद्यापीठाने ३२० उच्च उत्पादक वाण, ५६ कृषि अवजारे आणि १९२५ सुधारित शेती तंत्रज्ञान विकसित करून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविले आहे. तसेच ६२८४ वनस्पती जनुकसंपत्तीचे जतन करण्यात आले आहे. विद्यापीठाने नैसर्गिक शेतीचा प्रसार करण्यासाठी घेतलेले दूरदर्शी पाऊल कौतुकास्पद आहे. प्रात्यक्षिके व अनुभवाधारित युनिट्समुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून शिकण्याची संधी मिळत असून शिक्षण, संशोधन आणि समाजसहभाग यांचा समन्वय साधणारी नैसर्गिक शेतीची सशक्त परिसंस्था निर्माण होत आहे. या उपक्रमांमुळे नवकल्पना, आंतरशाखीय सहकार्य आणि शेतकरी–संस्थांमधील भागीदारी बळकट होत आहे. शाश्वत उपाय शोधणे, स्थानिक ज्ञान समृद्ध करणे आणि कृषि विकासात योगदान देणे यासाठी तरुणांना प्रेरणा मिळत आहे. आजचा दिवस विद्यार्थ्यांच्या परिश्रम, शिस्त आणि चिकाटीचे प्रतीक असून ते भारतीय कृषिचे भावी नेतृत्व आहेत. यावेळी त्यांनी विद्यापीठाच्या कृषि शिक्षण, संशोधन व विस्तार कार्यातील योगदानाचे कौतुक केले. यावेळी ते म्हणाले की आधी जय जवान, जय किसान, जय विज्ञान असे होते आता यात मा. पंतप्रधान यांनी जय अनुसंधानाची जोड दिली आहे. त्यांनी यावेळी मुख्यमंत्री मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस यांचे मानद डॉक्टर ऑफ सायन्स पदवी मिळाल्याबद्दल अभिनंदन केले.

मुख्यमंत्री मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या ३९ व्या पदवीप्रदान समारंभात उपस्थित राहणे माझ्यासाठी आनंद आणि अभिमानाची बाब आहे. डॉक्टर ऑफ सायन्स ही मानाची पदवी बहाल केल्याबद्दल मी विद्यापीठ व राज्यपाल महोदयांचे मनःपूर्वक आभार मानतो. महाराष्ट्र शासन आणि भारत सरकार कृषि क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना राबवत आहेत. राज्यातील शेतकऱ्यांना जलसुरक्षा आणि उर्जासुरक्षा देणे ही या सरकारची प्राथमिकता आहे. याकरीता उर्जा सुरक्षा योजनेच्या माध्यमातून या वर्षाच्या शेवटी शेतकऱ्यांना दिवसा १२ तास मोफत विजेचा पुरवठा करणार आहोत. सध्या शेतीसमोरील वातावरणातील बदल हे मोठे संकट आहे. वातावरणातील बदलामुळे हंगामामध्ये बदल होवून पिकांच्या उत्पादकतेवर परिणाम होत आहे. यावर पर्याय म्हणजे जैव तंत्रज्ञानाची मदत घेवून वातावरणातील बदलाला तोंड देणारे वाण विकसीत करण्यावर भर द्यावा लागेल. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने १२६ पिकांवर संशोधन केले आहे. विद्यापीठाने ३२० विविध वाणांची निर्मिती केली आहे. या विद्यापीठाने तयार केलेल्या रब्बी ज्वारीच्या वाणांखाली महाराष्ट्रातील २५ टक्के क्षेत्र आहे. राज्यातील ७५ टक्के शेतकरी अल्पभुधारक असून त्याला डोळ्यासमोर घेवून आपण संशोधन करु. पुढील काळात शेतीमालाला भाव मिळण्यासाठी उत्पादकता वाढवावी लागेल, उत्पादन खर्च कमी करावा लागेल तसेच मुल्यवर्धनाची साखळी तयार करावी लागेल. याचबरोबर कृषि तंत्रज्ञानावर आधारीत विविध उद्योग सुरु करावे लागतील. शेतीमध्ये कृत्रिम बुध्दीमत्ता या डिजीटल तंत्रज्ञानाच्या वापरामुळे खर्चामध्ये २५ टक्क्यांपर्यत बचत होऊन उत्पादनात ३० ते ४० टक्क्यांपर्यत वाढ होत असल्याचे त्यांनी सांगितले. चारही कृषि विद्यापीठांच्या मदतीने आपण महाविस्तार ॲप तयार केले आहे. या ॲपला ३० लाख शेतकरी जोडले गेले असून यावर शेतकऱ्यांच्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर मिळत आहे. या वर्षाच्या शेवटी या योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात आपली भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शेतीत नवकल्पना, तंत्रज्ञान आणि उद्योजकता यांचा संगम घडवून ग्रामीण भागात आर्थिक समृद्धी निर्माण करण्यासाठी आपण पुढाकार घ्यावा. आज पदवी प्राप्त करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे हार्दिक अभिनंदन. अनेक वर्षांच्या परिश्रमांनंतर तुम्ही आज हा महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने शिक्षण, संशोधन आणि विस्तार कार्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवले आहेत. आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन आणि नवकल्पनांच्या मदतीने कृषि क्षेत्र अधिक सक्षम करण्याची गरज आहे. प्रिय विद्यार्थ्यांनो, तुम्ही केवळ पदवीधर नाही तर कृषि विकासाचे दूत आहात. मोठी स्वप्ने पाहा, कठोर परिश्रम करा आणि शेतकरी व समाजाच्या प्रगतीसाठी कार्य करा. तुमच्या उज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

याप्रसंगी राज्याचे कृषि मंत्री तथा कृषि विद्यापीठाचे प्रतिकुलपती ना. श्री. दत्तात्रय भरणे म्हणाले की वातावरणातील बदलामुळे शेतीवर विपरीत परिणाम होत आहे. यावर मात करण्यासाठी कृषि क्षेत्रात आमुलाग्र बदल करून नवे तंत्रज्ञान स्विकारावे लागेल. मुंबई येथे झालेल्या कृत्रिम बुध्दीमत्तेवर घेतलेल्या परिषदेने दाखवून दिले की शेतीला कृत्रिम बुध्दीमत्तेशिवाय पर्याय नाही. विद्यार्थ्यांना उद्देशून ते म्हणाले की आपण कृषि शिक्षण घेतलेले विद्यार्थी आहात. त्यामुळे आपण केवळ नोकरीच्या संधी शोधणारे न राहता कृषि उद्योजक बनण्याचा संकल्प करावा. कृषि क्षेत्रामध्ये अन्नप्रक्रिया, मूल्यवर्धन, कृषि सेवा केंद्र, स्टार्टप्स, कृषि पर्यटन, सेंद्रिय शेती यासारख्या अनेक संधी उपलब्ध आहेत. या संधीचा उपयोग करून आपण रोजगार निर्माण करणारे उद्योजक बनू शकता. कृषि पदवीधरांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी, ग्रामीण विकासासाठी आणि देशाच्या अन्नसुरक्षासाठी करावा. शेतीच्या संदर्भात विविध योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा तुम्ही प्रयत्न करा असे आवाहन कृषिमंत्र्यांनी यावेळी केले.

वर्ष :६, अंक क्रं. : ६३, मार्च, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

प्रमुख पाहुणे डॉ. अशोक कुमार सिंग आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की आज पदवी व पारितोषिके प्राप्त केलेल्या सर्व विद्यार्थ्यांसाठी हा अत्यंत स्मरणीय क्षण असून त्यांच्या कठोर परिश्रमाचे हे फलित आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेत कृषि क्षेत्राचा मोठा वाटा असून देशाच्या जीडीपीमध्ये १८.२ टक्के तर रोजगारामध्ये ४५.६ टक्के योगदान या क्षेत्राचे आहे. १९५०–५१ मध्ये ५०.८२ दशलक्ष टन असलेले अन्नधान्य उत्पादन २०२४–२५ मध्ये ३५७.७३ दशलक्ष टनांपर्यंत वाढल्याचे त्यांनी नमूद केले. हरितक्रांतीनंतर सुधारित वाण, आधुनिक तंत्रज्ञान आणि योग्य धोरणात्मक पाठबळामुळे उत्पादनक्षमतेत मोठी वाढ झाली आहे. मात्र वाढती लोकसंख्या, हवामान बदल, पाण्याची टंचाई आणि मृदा ऱ्हास यांसारख्या आव्हानांमुळे कृषि क्षेत्रात वैज्ञानिक व तांत्रिक प्रगती अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. सुधारित वाणनिर्मिती, जीनोम एडिटिंग, बायोफोर्टिफिकेशन, कृत्रिम बुद्धिमत्ता, उपग्रह तंत्रज्ञान व काटेकोर शेती यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरातून शाश्वत शेती साध्य होऊ शकते. आपण संशोधन, शासकीय सेवा, कृषि उद्योग, ग्रामीण विकास किंवा उद्योजकता या कोणत्याही क्षेत्रात कार्य केले तरी लक्षात ठेवा–कृषि ही केवळ एक व्यवसाय नाही, तर मानवतेची सेवा आहे. विद्यार्थ्यांनी आपले ज्ञान शेतकरी व ग्रामीण समाजाच्या विकासासाठी वापरावे, असे आवाहन त्यांनी केले.

मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे विद्यापीठ अहवाल सादर करताना म्हणाले की विद्यापीठाने संशोधन, शिक्षण व विस्तार या तीनही क्षेत्रात दैदिप्यमान कामगिरी केली आहे. शेतकऱ्यांना उपयोगी ठरणाऱ्या १९२५ तंत्रज्ञान शिफारशी, विविध पिकांच्या ३२० वाणांची निर्मिती व ५६ कृषि अवजारे व यंत्रांची निर्मिती विद्यापीठाने केली आहे. राहुरी कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल्या प्रमुख ९ पिकांच्या उदा. ऊस, डाळिंब, हरभरा, रब्बी ज्वारी, कांदा, भात, लिंबू, बाजरी वाण आणि मोसंबी या वाणांचे आर्थिक विश्लेषण केले असता या ९ पिकांच्या वाणांमुळे आजपर्यंत राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये ढोबळमानाने एकुण रु. ३,९८,०९० कोटी व निव्वळ ५१,१४६ कोटी रुपये इतक्या महसुली उत्पन्नाची भर पडली आहे. विद्यापीठाने बदलत्या हवामानाला अनुरुप असे शेतकरीभिमुख संशोधन केलेले आहे. नवोन्मेष व विद्यार्थ्यांच्या विकासासाठी विद्यापीठाने स्पर्धा परिक्षा मंच, उद्योजकता विकास मंच आणि हायटेक शेती मंच स्थापन केले आहेत. हे उपक्रम विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हाणांसाठी तयार करुन त्यांना नोकरी शोधाणाऱ्यां ऐवजी नोकरी निर्माण करणारे बनवण्यास प्रोत्साहन देतील. या व्यतिरिक्त कृषि विद्यापीठ कृषि विस्तारामध्ये नवनविन उपक्रम राबवित आहे.

सन्माननीय राज्यपाल तथा कृषि विद्यापीठाचे कुलपती मा.श्री. जिष्णु देव वर्मा यांच्या शुभहस्ते मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस यांना कृषि क्षेत्रासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल डॉक्टर ऑफ सायन्स या मानद पदवीने सन्मानीत करण्यात आले. यावेळी मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांनी सन्मानपत्राचे वाचन केले. सन्माननीय राज्यपाल तथा कृषि विद्यापीठाचे कुलपती श्री. जिष्णु देव वर्मा यांनी यावेळी ७४ विद्यार्थ्यांना पीएच. डी., ३४६ विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी व ४,१८२ विद्यार्थ्यांना पदवी असे एकुण ४,६०२ पदव्या प्रदान केल्या. सन २०२४–२५ मध्ये बी.एस्स.सी (कृषि) पदवीत प्रथम आलेली कु. निकिता गोंडल, बी.एस्स.सी (उद्यान विद्या) मध्ये प्रथम आलेली कु. वैष्णवी शिंदे, कृषि अभियांत्रिकीमध्ये प्रथम आलेला चि. प्रज्वल येळवंडे यांनी सुवर्णपदक मिळविले. यावेळी पीएच.डी.च्या ४ विद्यार्थ्यांना सुवर्ण, पदव्युत्तर पदवीच्या २१ विद्यार्थ्यांना सुवर्ण, पदवीच्या १२ विद्यार्थ्यांना सुवर्ण व दोन विद्यार्थ्यांना रौप्य पदके प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती वंदन आणि दिप प्रज्वलनाने करण्यात आली. पदवीप्रदान समारंभाला अहिल्यानगरचे शिर्डी येथील लोकसभा सदस्य मा.खा.श्री. भाऊसाहेब वाकचौरे, शेवगांव येथील विधानसभा सदस्य मा. आ. श्रीमती मोनीका राजळे, अहिल्यानगर येथील बुऱ्हाननगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संचालक श्री. अक्षय कर्डिले, अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. पंकज अशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आनंद भंडारी, अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक श्री. सोमनाथ घार्गे, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, माजी मा. कुलगुरु डॉ. सुभाष पुरी, डॉ. आर.बी. देशमुख, डॉ. शंकरराव मगर, डॉ. अशोक ढवण, डॉ. किसनराव लवांडे, डॉ. व्यंकटेश मायंदे, माजी आ.श्री. चंद्रशेखर कदम, डॉ. हरी मोरे, कृषिभुषण सुरसिंग पवार, विद्या परिषद सदस्य, मान्यवर, पत्रकार, सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख, अधिकारी, शास्त्रज्ञ, विद्यार्थी, विद्यार्थीनी व प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांनी कृषि प्रदर्शनाला भेट दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी केले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात जागतिक महिला दिन संपन्न

**दि. ७ मार्च, २०२६.** आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष–२०२६ व जागतिक महिला दिन– २०२६ चे औचित्य साधून महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहामध्ये जागतिक महिला दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणुन ऑनलाईन पध्दतीने चेन्नई येथील एम. एस. स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशनच्या अध्यक्षा तथा नवी दिल्लीच्या भारतीय

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

मार्च २०२६

वर्ष :६, अंक क्रं. : ६३, मार्च, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी









वैद्यकीय संशोधन परिषदेच्या महानिदेशक आणि जागतिक आरोग्य संघटनेच्या माजी मुख्य वैज्ञानिक व उपमहानिदेशक डॉ. सौम्या स्वामीनाथन उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे होते. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणुन चेन्नई येथील एम.एस. स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशनच्या वरिष्ठ फेलो डॉ. आर.व्ही. भवानी उपस्थित होत्या. याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्याच्या उपवनसंरक्षक सौ. सुवर्णा माने (भारतीय वनसेवा) व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, पुणे तथा कृषि व्यवसाय व्यवस्थापन व स्मार्ट प्रकल्पाच्या तज्ञ सौ. उज्वला बाणखिले उपस्थित होत्या. यावेळी व्यासपीठावर सौ. सुरुची खर्चे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, पुणे येथील अटारीचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. शाकीर अली, कृषि तंत्रज्ञानाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजू अमोलिक, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, नियंत्रक श्री. सदाशिव पाटील, उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. बी.टी. पाटील व उपकुलसचिव (प्रशासन) श्री. विजय पाटील उपस्थित होते.

यावेळी ऑनलाईन मार्गदर्शन करतांना डॉ. सौम्या स्वामीनाथन म्हणाल्या की शेतीमध्ये महिलांची भागिदारी वाढत आहे. ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतराचे प्रमाण वाढल्यामुळे शेतीमध्ये कामे करण्यासाठी मजुरांची टंचाई भासत आहे. अशा परिस्थितीत महिलांना महिलांचे शेतीतील श्रम कमी करणाऱ्या अद्ययावत तंत्रज्ञानाची जोड द्यावी लागणार आहे. यासाठी महिला साक्षर असण्याबरोबरच त्यांना इंटरनेटची सुविधा उपलब्ध करुन द्यावी लागेल. यामुळे स्मार्टफोनच्या मदतीने शेती करणे महिलांसाठी अधिक सुलभ होईल व त्या अधिक सक्षमपणे शेती करु शकतील. महिलांचे घरामध्ये अन्न तयार करण्याबरोबरच शेतामध्ये धान्याचे उत्पादन घेण्यामध्ये महत्वाचे योगदान आहे. डॉ. एम.एस. स्वामीनाथन यांच्या संकल्पनेनुसार आपण जीवन जगत असतांना पर्यावरणातील महत्वाचे घटक असलेल्या पशुपक्षी यांना सुरक्षीत ठेवून तसेच नैसर्गिक संसाधनांना धक्का न लावता सर्वांनी आनंदात जगणे शक्य आहे, ही संकल्पना म्हणजे बायोहॅपीनेस सेंटर होय. आपण पुढच्या पिढीसाठी हे जग अधिक सुंदर करुन जावूया असे यावेळी त्या म्हणाल्या. याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे म्हणाले की महिलांचे शेतीमध्ये मोठे योगदान आहे. विद्यापीठाने तयार केलेले एकात्मिक शेती पध्दतीचे मॉडेल शेतकरी प्रथम प्रकल्पाच्या माध्यमातून चिंचविहिरे, कणगर, तांभेरे, कानडगावच्या शेतकरी महिलांनी स्वतःच्या शेतात राबविण्याबरोबरच त्याचा प्रचार व

वर्ष :६, अंक क्रं. : ६३, मार्च, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

प्रसार केला याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. या महिलांनी स्वतःच्या शेतामध्ये या एकात्मिक शेती पध्दतीच्या मॉडेलचा वापर केल्यामुळे त्यांच्या गावाचे उत्पन्न १.५ कोटी हुन ३.५ कोटीपर्यंत वाढले. फुले समृध्द व्हिलेज यामध्ये हीच संकल्पना आपण १० जिल्ह्यातील निवडलेल्या १० गावांमध्ये राबविणार आहोत. एम.एस. स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशनच्या सहकार्याने आपण देशातील पहिले बायोहॅपीनेस सेंटर आज सुरु केले आहे. यामुळे निसर्गातील जैव विविधतेचे संवर्धन होण्यास मदत हाऊन पारंपारिक वाणांचे जतन होईल.

याप्रसंगी डॉ. आर.व्ही. भवानी मार्गदर्शन करतांना म्हणाल्या की सन २०२३–२४ च्या अहवालानुसार महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात ८० टक्क्यापेक्षा जास्त महिला शेतीमध्ये कार्यरत आहेत. लवकरच महाराष्ट्र शासन शेतीमध्ये काम करणाऱ्या महिलांसाठी जास्त अधिकार देणारी योजना कार्यान्वित करणार आहे. पर्यावरण व मानवी कल्याणासाठी डॉ. एम.एस. स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशन बायोहॅपीनेस सेंटर्स देशभरात सुरु करणार आहे. देशामध्ये या सेंटरची सुरुवात करणारे महात्मा फुले कृषि विद्यापीठ हे पहिले विद्यापीठ असल्याचे त्या म्हणाल्या. यावेळी सौ. सुवर्णा माने, सौ. उज्वला बानखेले व डॉ. शाकीर अली यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी केले. यावेळी भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या शेतकरी प्रथम प्रकल्पातील महिला शेतकरी यांचा मान्यवरांचे हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये चिंचविहीरे, कणगर, तांभेरे आणि कानडगाव येथील सौ. निर्मला गाडे, सौ. सविता पवार, सौ. पल्लवी गाडे, सौ. सविता वरगुडे, सौ. संगीता गागरे, सौ. अनिता गागरे, सौ. ज्योती गागरे, सौ. सविता गागरे, मु. पो. शेडशळ, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथील सौ. वैशाली संकपाळ व सौ.शमशादबी पठाण यांचा यामध्ये समावेश होता. यावेळी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील दहा जिल्ह्यांमधील दहा गावांमध्ये फुले समृद्ध व्हिलेज अभियानाचा शुभारंभ करण्यात आला तसेच नाशिक व जळगाव जिल्ह्यातील ३० गावांमध्ये फुले पोकरा (नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प) संजीवनी व्हिलेज अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील १७ कृषि विज्ञान केंद्रे आणि १० कृषि तंत्रज्ञान विद्यालय येथे फुले एकात्मिक शेती पध्दती मॉडेल मिशनचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते नैसर्गिक शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र येथे बायोहॅपीनेस सेंटरचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी नैसर्गिक शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र आणि निसर्ग प्रक्षेत्र, रोपवाटिका व उद्यानविद्या फळपिके थेट पीक प्रात्यक्षिक प्रक्षेत्र या ठिकाणी भेटी देण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी तर आभार डॉ. प्रशांत बोडके यांनी मानले. या कार्यक्रमास शास्त्रज्ञ, प्राध्यापक, अधिकारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी, शेतकरी, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे विद्यापीठाचा ५७ वा वर्धापन दिन साजरा





**दि. २९ मार्च, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या ५७ व्या वर्धापन दिनानिमित्त कोल्हापूर येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय कृषि महाविद्यालयात विविध विकास कामांचे लोकार्पण कृषिमंत्री तथा विद्यापीठाचे प्रतिकूलपती मा. ना. श्री. दत्तात्रय भरणे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे, जिल्हा परिषद अध्यक्ष श्रीमती शिल्पा खोत, कृषि परिषदेचे उपाध्यक्ष श्री. तुषार पवार, विद्यापीठाचे कार्यकारी परिषदेचे सदस्य श्री. दत्तात्रेय उगले, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता डॉ. सातापप्पा खरबडे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, कोल्हापूर कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.शैलेंद्र कांबळे, कराड कृषि महाविद्यालयाच्या सहयोगी अधिष्ठाता डॉ. इंदिरा घोणमोडे, सहयोगी

वर्ष :६, अंक क्रं. : ६३, मार्च, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी






संशोधन संचालक डॉ. सुनील कराड, डॉ. सोमनाथ माने, नगरसेवक श्री.आदिल फरास, श्री.बाबासाहेब पाटील, श्री. अरुण डोंगळे, कृषि सहसंचालक श्री. बसवराज मास्तोळी व जिल्हा कृषि अधिकारी श्री.जालिंदर पांगरे उपस्थित होते.

यावेळी मा. ना.श्री. दत्तात्रय भरणे म्हणाले की कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे महाराष्ट्र कृषि क्षेत्रात आघाडीवर आहे. यावेळी मा. ना. श्री. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते केंद्रीय कृषिमंत्री पुरस्कार प्राप्त शेतकरी तसेच सात संशोधन केंद्रांसह सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी नियोजित मुख्य प्रशासकीय इमारत सभागृह, नियोजित अदिती गृह इमारतीची पाहणी केली. त्यांच्या हस्ते मुख्य प्रवेशद्वाराजवळील कृषि निविष्ठा उत्पादने व विक्री केंद्राचे उद्घाटन, उद्यानविद्या विभागांतर्गत हायड्रोपोनिक्स प्रकल्पाचे लोकार्पण, कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र, विद्यार्थिनी वसतिगृहाचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. साताप्पा खरबडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शैलेंद्र कांबळे यांनी आभार मानले तर डॉ. आनंद चवई यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राध्यापक,अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात कृषि विज्ञान केंद्रांची कृती कार्यशाळा संपन्न



**दि. ३१ मार्च, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ आणि कृषि तंत्रज्ञान अवलंबन संशोधन संस्था, विभाग–८, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील १८ कृषि विज्ञान केंद्रांची एक दिवसीय कृती कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे होते. याप्रसंगी व्यासपीठावर विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, कृषि तंत्रज्ञानाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजू अमोलिक व काष्टी मालेगाव येथील कृषि विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. सचिन नांदगुडे उपस्थित होते. यावेळी पुणे येथील कृषि तंत्रज्ञान अवलंबन संशोधन संस्थेचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. शाकिर अली सैद ऑनलाइन उपस्थित होते.

याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे म्हणाले की कृषि विद्यापीठाच्या विकसीत तंत्रज्ञानाचे मोठ्या

प्रमाणावर प्रात्येक्षिक घेणे हे कृषि विज्ञान केंद्राचे महत्वाचे कार्य आहे. पीक प्रात्यक्षिके, पीक संग्रहालय आणि आद्यरेखा प्रात्यक्षिके यांच्या माध्यमातून कृषि विज्ञान केंद्रे तंत्रज्ञान प्रसाराचे काम करत असतात. विद्यापीठाने विकसीत केलेले तंत्रज्ञान कार्यक्षेत्रातील प्रत्येक शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी कृषि विज्ञान केंद्रांची भूमिका ही फार महत्वाची आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेले तंत्रज्ञान व संशोधित केलेले विविध वाण ही विद्यापीठाची फार मोठी ताकद आहे. फुले कृषि तंत्रज्ञान घरोघरी, समृध्दी येईल गावोगावी या संकल्पनेअंतर्गत विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील १० जिल्ह्यातील १० गावे आपण मॉडेल व्हिलेज म्हणून विकसीत करणार आहोत. प्रत्येक कृषि विज्ञान केंद्राने मॉडेल व्हिलेज ही संकल्पना प्रत्यक्ष राबविण्यासाठी येत्या एप्रिल महिन्यात निवडलेल्या गावांचा बेंच मार्क सर्व्हे पुर्ण करावा. त्यानंतर मे महिन्यात मॉडेल व्हिलेजकरता खरीप हंगामासाठी लागणाऱ्या सर्व निविष्ठांची पुर्तता संदर्भात खात्री करावी व जून महिन्यात सर्व सहयोगी संस्थांच्या सहकार्याने प्रत्यक्ष काम सुरु करावे. त्याचबरोबर सर्व कृषि विज्ञान केंद्रांनी त्यांच्या प्रक्षेत्रावर विद्यापीठाने तयार केलेले एकात्मिक शेती पध्दतीचे मॉडेल राबवून त्याचा जास्तीत जास्त प्रसार करावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यාप्रसंगी डॉ. गोरक्ष ससाणे मार्गदर्शन करतांना म्हणाले की कृषि विज्ञान केंद्रांनी मॉडेल व्हिलेज ही संकल्पना राबवून विद्यापीठातील विविध पिकातील अद्ययावत संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहचवावे. कृषि विज्ञान केंद्रांच्या शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांच्या समस्यांवर अभ्यास करुन पिकपध्दतींचे नियोजन करावे असे यावेळी ते म्हणाले. डॉ. प्रशांत बोडके यांनी प्रत्येक कृषि विज्ञान केंद्रांने फुले कृषि समृध्दी व्हिलेज याची अंमलबजावणी करावी तसेच त्यांच्या आगामी नियोजनामध्ये नैसर्गिक शेती तसेच पशुपालन संबंधीत घटकांचा विचार करावा असे सांगितले. डॉ. शाकिर अली सैद ऑनलाइन पद्धतीने उपस्थित राहून मार्गदर्शन करताना म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विविध पिकांमध्ये संशोधन करुन शेतकऱ्यांसाठी मोठे योगदान दिले आहे. प्रत्येक कृषि विज्ञान केंद्राने आपल्या प्रयोगांचे नियोजन करताना हवामानातील बदल तसेच नैसर्गिक शेती या महत्त्वाच्या असणाऱ्या घटकांचा अंतर्भाव करावा. प्रत्येक हंगामासाठी पीक संग्रहालय तयार करावे जेणेकरुन कृषि विज्ञान केंद्रास भेट देणारे शेतकरी ते तंत्रज्ञान बघतील. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. मृणाल अजोतीकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. या कृती कार्यशाळेसाठी विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख, विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील एकूण १८ कृषि विज्ञान केंद्रांचे प्रमुख शास्त्रज्ञ उपस्थित होते. या एक दिवसीय कार्यशाळेत कृषि विज्ञान केंद्रांचा मागील वर्षाचा आढावा व पुढील वर्षाचे संशोधन व विस्ताराचे नियोजन निर्धारीत करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी तर आभार डॉ. सचिन सदाफळ यांनी मानले.

## आदिवासी उपयोजनेअंतर्गत लाभार्थी आदिवासी शेतकऱ्यांना चारापिके बियाणे व कृषि निविष्ठा वाटप कार्यक्रम सपंन्न



**दि. ५ मार्च, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित चारापिके संशोधन प्रकल्प विभागाच्या आदिवासी उपयोजना अंतर्गत प्राप्त अनुदानातून मौजे पालीपाडा, ता. नवापूर, जि.नंदूरबार येथील आदिवासी शेतकऱ्यांना रब्बी हंगामात ओट व बरसीम या चारापिके बियाण्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये पीक वाढीनंतर आवश्यक असणारे मनुष्यचलित सायकल कोळपे, सुक्ष्म अन्नद्रव्ये–II, मेटॅन्हायझिअम, कृषिदर्शनी व दुष्काळी व कमी पाण्याची आवश्यकता असणारे काटे विहरीत निवडूंग (कॅक्टस) पाने व नेपीअर ठोंबे या कृषि निविष्ठांचा समावेश होता.

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांचे मार्गदर्शनाखाली संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांनी या

कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुरेश दोडके, चारा पैदासकार डॉ. लक्ष्मण तागड यांच्या नियोजनाखाली या योजनेतील शास्त्रज्ञ डॉ. योगेश सैदाणे, डॉ. संदिप लांडगे, कनिष्ठ संशोधन सहाय्यक श्री. दिपक पालवे, कृषि सहाय्यक श्री. सुहास भालेराव व कृषि विज्ञान केंद्र, नंदूरबार येथील शास्त्रज्ञ व समन्वयक श्री. योगेश पाडवी यांच्या उपस्थितीत विविध निविष्ठांचे ३० लाभार्थी आदिवासी शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी या योजनेतील अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. या प्रसंगी पालीपाडा व श्रावणी गावचे सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य, पोलिस पाटील तसेच प्रगतशिल शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांची कोल्हापूर येथील प्रादेशिक ऊस व गूळ संशोधन केंद्रास भेट






**दि. २६ मार्च, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी कोल्हापूर येथील प्रादेशिक ऊस व गुळ संशोधन केंद्रास सदिच्छा भेट दिली. यावेळी विभागीय कृषि संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. सुनील कराड, प्रादेशिक ऊस व गूळ संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. विद्यासागर गेडाम, डॉ. दीपक सावळे, डॉ. गोविंद एनगे व डॉ. चंद्रकांत कांबळे उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे म्हणाले की कोल्हापूर येथील प्रादेशिक ऊस व गूळ संशोधन केंद्र शेतकरी आणि नवउद्योजकांसाठी दीपस्तंभ ठरत आहे. येथील विकसित तंत्रज्ञानाचा लाभ घेऊन ग्रामीण भागात अधिकाधिक नवउद्योजक निर्माण व्हावेत. यावेळी त्यांनी हवामान बदलाच्या काळात पूर परिस्थितीस सहनशील वाण विकसित करणे ही काळाची गरज असल्याचे नमूद केले. याप्रसंगी मा. कुलगुरूंच्या हस्ते अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत महिला स्वयंसहायता गटांना उद्योजकता विकासासाठी आवश्यक उपकरणाचे वाटप करण्यात आले. यामध्ये केरली येथील रमाई, निगवे दुमाला येथील संघमित्रा, कोल्हापूरच्या जनाई बिस्कीट इ.बचत गटांचा समावेश होता. याप्रसंगी प्रादेशिक ऊस व गूळ संशोधन केंद्राच्या वतीने लाभार्थ्यांना काकवी तंत्रज्ञान परवाना करार हस्तांतरण करण्यात आला. यावेळी श्रीमती सोनाली पवार, श्रीमती प्रियांका कांबळे व श्रीमती कल्पना कांबळे या उद्योजकांनी मनोगत व्यक्त केले.

## कृषि महाविद्यालय, पुणे येथे जागतिक जल दिन साजरा

**दि. २२ मार्च, २०२६.** कृषि महाविद्यालय, पुणे येथे जिथे पाणी वाहते तेथे समानता वाढते या घोषवाक्यावर आधारित जागतिक जल दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ समाजसेवक पद्मश्री डॉ. पोपटराव पवार उपस्थित होते. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने उपस्थित होते. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे म्हणाले की पाणी हा अत्यंत संवेदनशील आणि जिव्हाळ्याचा विषय आहे. विद्यापीठाने पाणलोट क्षेत्र विकासाचे मॉडेल उभारून शास्त्रीय दृष्टिकोनातून जल व्यवस्थापनाला दिशा दिली आहे. सोलापूर येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय प्रकल्पातून जलसंवर्धनासाठी शिफारशी विकसित केल्या जात आहेत. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर हवामान अनुकूल शेती, जैवविविधता संवर्धन आणि नैसर्गिक शेती यावर विद्यापीठाने विशेष भर दिला आहे. देशी गाईंचे संशोधन, बायो रिसोर्स सेंटर तसेच एकात्मिक शेती पद्धतीचा प्रसार अशा विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. तंत्रज्ञानाचा योग्य वापर

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

मार्च २०२६

वर्ष :६, अंक क्रं. : ६३, मार्च, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी






करून संसाधन निर्मिती करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. पोपटराव पवार आपल्या भाषणात म्हणाले की पाणी व्यवस्थापन ही केवळ तांत्रिक बाब नसून ती सामाजिक, आर्थिक आणि नैतिक जबाबदारी आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी दिलेला खेड्याकडे चला हा संदेश आपण विसरलो आणि त्याचे परिणाम आज नद्यांच्या बदललेल्या प्रवाहात व प्रदूषणात स्पष्टपणे दिसत आहेत. स्वातंत्र्यानंतर प्रगतीच्या नावाखाली आपण निसर्गापासून दूर गेलो. शिक्षण आणि सद्भावना या मूलभूत मूल्यांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे पंचमहाभूत आणि मानवी जीवनातील समतोल ढासळला. आज अनेक नद्या सांडपाणी वाहक बनल्या आहेत. भूजल प्रदूषित झाले आहे आणि पर्यावरणीय संकट तीव्र होत चालले आहे. हिवरेबाजारचा परिवर्तनाचा प्रवास सांगताना त्यांनी हिवरेबाजार या अल्प पर्जन्यमान असलेल्या गावाने जलसंधारण आणि लोकसहभागाच्या माध्यमातून घडवलेला विकास देशासाठी आदर्श ठरला आहे. नालाबांधणी, पाणलोट क्षेत्र विकास, वृक्ष संवर्धन आणि सामाजिक शिस्त यांच्या माध्यमातून गावाने दुष्काळावर मात केली. शेतकऱ्यांचे उत्पादन पाचपट वाढले, गाव दारिद्र्य मुक्त झाले आणि प्रति व्यक्ती उत्पन्न सुमारे नऊ लाखापर्यंत पोहोचले असे ते यावेळी म्हणाले. वनसंवर्धन, मृद संवर्धन आणि जलसंवर्धन यांचा समन्वय साधल्याशिवाय शाश्वत विकास शक्य नाही असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. महानंद माने यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात जलपूजनाने करण्यात आली. विद्यार्थी ऋतुराज भोसले आणि विभावरी वाकचौरे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ आणि अफार्म, पुणे यांच्यामध्ये सामंजस्य करार संपन्न

**दि. २३ मार्च, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ आणि अफार्म, पुणे यांच्यामध्ये शाश्वत ग्रामीण उपजीविका आणि हवामान अनुकूल कृषि तंत्रज्ञानावरील सहकार्य अधिक दृढ व व्यापक करण्यासाठी औपचारिकपणे सामंजस्य करार करण्यात आला. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे आणि अफार्मचे अध्यक्ष डॉ. व्यंकटराव मायंदे यांच्या उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या धोरणात्मक भागीदारीचा व्यापक उद्देश हा सातत्याने बदलत्या हवामान परिस्थितीत ग्रामीण उपजीविकेतील उदयनमुख आव्हानांना सामोरे जाण्यासाठी वैज्ञानिक संशोधन, क्षेत्रीय अंमलबजावणी आणि ज्ञानप्रसार यांचे एकत्रिकरण करणे हा आहे. या सामंजस्य करारामध्ये संशोधन, विस्तार, प्रशिक्षण आणि ज्ञान आदान प्रदान या क्षेत्रामध्ये संयुक्तपणे राबवल्या जाणाऱ्या कार्यक्रमाबद्दल विशेष आराखडा असेल. त्यामुळे वैज्ञानिक नवकल्पना ग्रामीण समुदायांपर्यंत प्रभावीपणे पोचू शकतील. महाराष्ट्र ग्रामीण उपजीविका शिखर परिषद २०२६ दरम्यान महात्मा फुले कृषि विद्यापीठ आणि अफार्म यांच्यात सुरू झालेल्या सहकार्यानंतर झालेला हा सामंजस्य करार या क्षेत्रात काम करण्यासाठी निश्चितच पथदर्शक असेल. हा सामंजस्य करार तीन वर्षासाठी असून या मार्फत संयुक्त पथदर्शी उपक्रम व क्षेत्रीय चाचण्या आणि व्यापक प्रसारासाठी मॉडेल्सचा विकास अपेक्षित आहे. डॉ. व्यंकटराव मायंदे यावेळी म्हणाले की या सामंजस्य करारामध्ये संशोधन, विस्तार, प्रशिक्षण आणि ज्ञान आदान प्रदान या सर्व विषयांबद्दल केल्या जाणाऱ्या प्रयत्नांची तरतूद आहे. त्यामुळे वैज्ञानिक नवकल्पना ग्रामीण समुदायापर्यंत प्रभावीपणे पोहोचतील. अफार्मचे कार्यकारी संचालक श्री. सुभाष तांबोळी यावेळी उपस्थित होते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
मफुकृवि ई वार्ता
मार्च २०२६



## रवांडा येथील सिंचन अभियंत्यांची महात्मा फुले कृषि विद्यापीठास भेट



**दि. २४ मार्च, २०२६.** राष्ट्रीय जल अकादमी, केंद्रीय जल आयोग, पुणे यांच्यातर्फे पाणी कार्यक्षम सिंचन प्रणालीचे नियोजन व रचना या विषयावर रवांडा सरकारच्या सिंचन अभियंत्यांसाठी तीन आठवड्यांचा प्रशिक्षण कार्यक्रम राष्ट्रीय जल अकादमी, केंद्रिय जल आयोग, पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून रवांडा सरकारच्या सिंचन अभियंत्यांचे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे दोन दिवसांच्या अभ्यास भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या भेटीचा उद्देश महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील शेतस्तरावरील प्रात्यक्षिके प्रक्षेत्र आणि सूक्ष्म सिंचन तंत्रज्ञानाची ओळख करून घेणे हा होता. या भेटीप्रसंगी मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे उपस्थित होते. याप्रसंगी पुणे येथील जल संसाधन प्रबंधन विभागाचे संचालक श्री. मिलिंद पानपाटील, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके व विस्तार शिक्षण संचालनालयाचे डॉ. मृणाल अजोतीकर उपस्थित होते.

यावेळी मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे मार्गदर्शन करतांना म्हणाले की पाण्याच्या अतिवापरामुळे जमिनी क्षारपड व चोपण होत आहेत. या मानवनिर्मित समस्येमुळे पिकांची उत्पादनक्षमता कमी होत आहे. या समस्येच्या प्रतिबंधासाठी जलसिंचनाचा काटेकोरपणे वापर होणे आवश्यक असून या महत्वपूर्ण विषयाची माहिती घेण्यासाठी विद्यापीठात आलेल्या रवांडा देशातील सर्व सिंचन अभियंत्यांना विद्यापीठात झालेल्या संशोधनाचा निश्चित फायदा होईल. यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे यांनी या सिंचन अभियंत्यांच्या अभ्यासदौऱ्याचा उद्देश याबद्दल उपस्थितांना अवगत केले. याप्रसंगी डॉ. प्रशांत बोडके म्हणाले की सूक्ष्म सिंचन यावरील संशोधनाची सुरुवात सन १९७२ साली महात्मा फुले कृषि विद्यापीठात झाली. सिंचन अभियांत्रिकी व सूक्ष्म सिंचनामध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे महत्वपूर्ण योगदान आहे. या दोन दिवसीय भेटीमध्ये कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, कृषि अभियांत्रिकी विभाग व प्रात्यक्षिक प्रक्षेत्र (कास्ट प्रकल्प), जलसिंचन अभियांत्रिकी क्षेत्रातील नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान, अखिल भारतीय समन्वित जलसिंचन व्यवस्थापन प्रकल्प आणि लाईसीमीटर संशोधन केंद्र, सेंद्रिय शेती आणि नैसर्गिक शेती तंत्रज्ञान व प्रशिक्षण केंद्र, उद्यानविद्या विभागातील प्रक्षेत्र, अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्प आणि सूक्ष्म सिंचन प्रात्यक्षिक प्रक्षेत्र या ठिकाणी भेटी देण्यात आल्या. महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सुनील कदम, आंतरविद्याशाखा जलसिचंन व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. विजय पाटील, बियाणे विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नरेंद्र काशीद, सेंद्रिय शेती प्रकल्पाचे प्रमुख डॉ. उल्हास सुर्वे, विस्तार शिक्षण संचालनालयाचे डॉ. मृणाल अजोतीकर, डॉ. पोपळे, डॉ. वैभव मालुंजकर या शास्त्रज्ञांनी या भेटीप्रसंगी संबंधीत विभागांची माहिती दिली.

## कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांचे नेवासा तालुक्यातील शेतकऱ्याना डाळिंब पिकावरील किडींसंदर्भात मार्गदर्शन



**दि. ६ मार्च, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील हॉर्टसॅप योजनेतील शास्त्रज्ञांनी मौजे महालक्ष्मी हिवरे, मांडेगव्हाण, देडगाव ता. नेवासा जि. अहिल्यानगर येथे डाळिंब या पिकाची पाहणी करून मार्गदर्शन केले. यावेळी अखिल भारतीय समन्वित कोरडवाहू फळपिके योजनेतील कीटकशास्त्रज्ञ डॉ. अजय हजारे, हॉर्टसॅप प्रकल्पातील संशोधन सहयोगी डॉ. प्रवीण खैरे, कृषि विभागाचे मांडेगव्हाणचे सहाय्यक कृषि अधिकारी श्री. ढोडदे, देडगावचे सहाय्यक कृषि अधिकारी श्री. दीपक कंकाळ व महालक्ष्मी हिवरेचे

सहाय्यक कृषि अधिकारी श्री. ऋषिकेश ढोकणे हे उपस्थित होते. या भेटीदरम्यान शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांना खोड भुंगेरे/खोड किड व्यवस्थापन यावर सविस्तर मार्गदर्शन करून शेतकऱ्यांच्या शंकांचे समाधान केले. यावेळी शेतकऱ्यांना घडीपत्रिकांचे वाटप करण्यात आले. या भेटीसाठी हॉर्टसॅप प्रकल्प प्रमुख तथा वनस्पती रोगशास्त्र व अणूजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रवींद्र गायकवाड, हॉर्टसॅप प्रकल्प समन्वयक तथा सहयोगी प्राध्यापक डॉ. संजय कोळसे तसेच अ.भा.स. कोरडवाहू फळपीके संशोधन प्रकल्पाचे रोगशास्त्रज्ञ डॉ. प्रकाश मोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

## हॉर्टसॅपअंतर्गत डाळिंब पिकावरील मावा कीड व्यवस्थापनासाठी भेटी व मार्गदर्शन





**दि. २५ मार्च, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील हॉर्टसॅप प्रकल्पातील शास्त्रज्ञ तसेच कृषि विभागातील अधिकारी यांनी मौजे कोल्हार बुद्रुक, निर्मल पिंपरी, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर येथे हॉर्टसॅपअंतर्गत डाळिंब या पिकाची पाहणी करून मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी डाळिंब पिकावरील मावा किडीच्या व्यवस्थापनाबद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांना घडीपत्रिकांचे वाटप करण्यात आले. यावेळी हॉर्टसॅप प्रकल्पातील संशोधन सहयोगी डॉ. प्रवीण खैरे, कृषि विभागाच्या सहाय्यक कृषि अधिकारी श्रीमती मीना जाधव व श्रीमती जया निमसे या उपस्थित होत्या. या भेटीसाठी हॉर्टसॅप प्रकल्प प्रमुख तथा पीक रोगशास्त्र व अनुजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रवींद्र गायकवाड, हॉर्टसॅप प्रकल्प समन्वयक तथा सहयोगी प्राध्यापक डॉ. संजय कोळसे, अखिल भारतीय समन्वित कोरडवाहू फळपिके संशोधन प्रकल्पाचे रोगशास्त्रज्ञ डॉ. प्रकाश मोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

# कृषि महाविद्यालय, संशोधन केंद्र व तंत्र विद्यालयांचे विविध उपक्रम

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन




**दि. ५ मार्च, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत हाळगावच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयात सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी यांची वैद्यकीय तपासणी करून विविध रक्त चाचण्यांसाठी रक्त नमुने घेण्यात आले. तसेच, दैनंदिन जीवनात

संतुलित आहार, योग, व्यायामाचे महत्व यावर आरोग्य शिक्षण देण्यात आले. सदर शिबिरात रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण, कॅल्शियमचे प्रमाण, थायरॉईड, यकृत व मुत्रपिंडाचे कार्य, हृदयरोग तपासणीमध्ये लिपिड प्रोफाईल, रक्तातील साखरेचे प्रमाण अशा विविध प्रकारच्या तपासण्या करण्यात आल्या. या सर्व तपासण्या विद्यार्थ्यांना त्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य संतुलित ठेवण्यासाठी व अधिकारी व कर्मचारी यांचे दैनंदिन आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी फायदेशीर ठरतील. यावेळी एकूण १४४ अधिकारी/ कर्मचारी व विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांनी भूषविले. यावेळी, विद्यार्थी परिषद उपाध्यक्षा डॉ. प्रेरणा भोसले, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पोपट पवार, मुख्य समुपदेशक डॉ. गोकुळ वामन, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी, डॉ. मनोज गुड, वैद्यकीय अधिकारी डॉ. दिपक वाळुंजकर उपस्थित होते. अरणगाव प्राथमिक आरोग्य केंद्र वैद्यकीय अधिक्षक डॉ. सचिन रेडे, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. स्वाती चकोर, डॉ. संजीवनी बारस्कर, आरोग्य निरीक्षक सुधाकर राख, आरोग्यसेवक राजेंद्र बांगर, आरोग्यसेविका राणी नागरगोजे, महालॅब टेक्निशिअन सुरेश यादव व अमोल नागवडे यांच्या पथकाने वैद्यकीय तपासणी केली. सदर शिबिरास विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद नोंदवला.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे जागतिक महिला दिन कार्यक्रम संपन्न





**दि. ८ मार्च, २०२६.** हाळगाव येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अहिल्यानगर येथील जागतिक आरोग्य सल्लागार सौ. सपना सुसे–कानडे यांनी प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थी परिषद उपाध्यक्षा डॉ. प्रेरणा भोसले, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पोपट पवार, सहाय्यक प्राध्यापक डॉ. मनोज गुड, डॉ. विवेकानंद कुलकर्णी, डॉ. निकिता धाडगे, डॉ. धनेश्वर पाटील, कर्मचारी अनिता पुराणे यांच्यासह महाविद्यालयातील महिला कामगार व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना सौ. सपना सुसे–कानडे म्हणाल्या की, महिलांना आपल्या दैनंदिन जीवनात वेगवेगळ्या भूमिका आणि जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. महिलांनी आपले आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी रोजच्या दिनक्रमात समतोल आहार व कसरत करणे गरजेचे आहे. निरोगी जीवनशैलीचे महिलांच्या आयुष्यात अनेक फायदे आहेत. निरोगी आरोग्य ही यशाची गुरुकिल्ली आहे. महिलांनी आपल्या आरोग्याबाबत जागरूक राहून यशाकडे वाटचाल करावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले. डॉ. दत्तात्रय सोनवणे यांनी याप्रसंगी महिलांच्या विविध कलागुणांचा गौरव केला. विद्यार्थिनींना प्रेरणादायी विचारांनी संबोधित करत शिक्षणासोबत आत्मविश्वास, कष्ट आणि सकारात्मक विचार यांचे महत्त्व पटवून दिले. भविष्यातील आव्हानात्मक संधींना गवसणी घालून यशाची शिखरे सर करण्यासाठी प्रोत्साहीत केले. महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. अंजली गायवळ व कु. प्रीती कवळे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमादरम्यान महाविद्यालयातील सर्व महिला प्राध्यापिका, विद्यार्थिनी तसेच महिला सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. डॉ. प्रेरणा भोसले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. निकिता धाडगे यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन कु. वैष्णवी खाडे व कु. पायल देशमुख यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप कु. नम्रता कदम यांच्या आभार प्रदर्शनाने झाला.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी



**दि. १२ मार्च, २०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थी परिषद उपाध्यक्षा डॉ. प्रेरणा भोसले यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अपर्ण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर स्वयंसेवक चि. अक्षय कोडलिंगे, कु. आरती गायकवाड यांनी यशवंतराव चव्हाण हे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आणि पहिले मुख्यमंत्री होते अशी ओळख मनोगतातून उपस्थितांना पटवून दिली. त्यांनी राज्याच्या औद्योगिक व कृषि विकासाचा पाया रचला, सहकार चळवळ रुजवली आणि पंचायत राज लागू करून सत्तेचे विकेंद्रीकरण केले. भारताचे संरक्षणमंत्री, अर्थमंत्री आणि उपपंतप्रधान म्हणूनही त्यांनी केंद्रीय पातळीवर महत्त्वाचे योगदान दिले असे स्पष्ट केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न





**दि. १७ मार्च, २०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ–२०२६ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. सातापा खरबडे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे बहिस्थ शिक्षण मंडळाचे प्राध्यापक व सुप्रसिध्द युवा व्याख्याते प्रा. निलेश पर्बत उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्रभारी सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रेरणा भोसले, प्रभारी विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष डॉ. गोकुळ वामन, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी, विद्यार्थी परिषद सभापती चि. भुषण बाबर, संयोजक ज्ञानेश्वरी गायके, श्वेता पाटील, मृणालिनी सरोते उपस्थित होते. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. सातापा खरबडे म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठामार्फत शिक्षण, संशोधन, विस्ताराचे कार्य जोमाने सुरु आहे. त्याबरोबरच नवीन शैक्षणिक धोरण–२०२० नुसार कृषि क्षेत्रात विविध नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमांचा समावेश करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा करता येईल याकडे लक्ष केंद्रीत केले आहे. या अभ्यासक्रमातून नाविन्यपूर्ण कृषि उद्योजक, उत्कृष्ट प्राध्यापक व कृषि शास्त्रज्ञ तयार करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती नव्याने रुजविण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. विविध गुण संपादन करून विद्यापीठाचे नाव उज्वल करण्यासाठी प्रयत्नशील राहा.

यावेळी सुप्रसिद्ध युवा व्याख्याते प्रा. निलेश पर्बत यांनी आपल्या मार्गदर्शनातून मानवी जीवनातील प्रत्येक टप्प्यावर दुःखाचा जो अंधकार पसरलेला आहे, त्या दुःखाला कवटाळून न बसता ज्ञान संपादन करून समाजातील दुःख दूर सारण्याचा प्रयत्न करा असे प्रतिपादन केले. व्यक्तिमत्त्व विकासासाठी स्वतःचे SWOT विश्लेषण करा. आपल्यातील सामर्थ्यांवर भर द्या, कमकुवतपणा स्वीकारा व त्यावर काम करा, संधी ओळखायला शिका व धोके टाळा असा सल्ला त्यांनी दिला. डॉ. गोकुळ वामन यांनी सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तसेच वर्षभरात राबवलेल्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती दिली. आपले महाविद्यालय भविष्यात विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच प्रयत्नशील राहील, असे आश्वासन डॉ. प्रेरणा भोसले यांनी आपल्या मनोगतातून दिले. विद्यार्थी परिषद सभापती चि. भुषण बाबर यांनी विद्यार्थी परिषदेमार्फत घेतलेल्या विविध उपक्रमांचा अहवाल तर संयोजक क्रीडा समिती कु. ज्ञानेश्वरी गायके यांनी क्रीडा उपक्रमांचा अहवाल सादर केला. वैयक्तिक व सांघिक स्पर्धांमध्ये विजयी झालेल्या २४० विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कृषि पदवीच्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी सर्व सांघिक स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक पटकावत अव्वल स्थान प्राप्त केले. तसेच कु. ज्ञानेश्वरी गायके या विद्यार्थिनीने सर्वोत्कृष्ट खेळाडूचा किताब जिंकला. महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक कृषि अर्थशास्त्र डॉ. उत्कर्षा गवारे व सहाय्यक प्राध्यापक वनस्पती रोगशास्त्र डॉ. किरण चौधरी यांच्या अध्यापन क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल डॉ. सात्ताप्पा खरबडे यांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रणाली ठाकरे, प्रा. अर्चना महाजन व आभारप्रदर्शन डॉ. प्रणाली ठाकरे यांनी केले. राष्ट्रगान व राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे शहीद दिन साजरा



**दि. २३ मार्च, २०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत सर्वोच्च बलिदानाचे स्मरण आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शहीद दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरूवात सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या हस्ते शहीद भगत सिंग, सुखदेव व राजगुरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी यांनी शहीद दिन तरुण पिढीमध्ये देशभक्ती, साहस आणि निस्वार्थी बलिदानाची भावना जागृत करतो असे स्पष्ट केले. लाला लजपतराय यांच्या हत्येचा बदला घेण्यासाठी शहीद भगत सिंग, सुखदेव व राजगुरू यांनी ब्रिटीश अधिकारी सँडर्सला गोळ्या घातल्या. या प्रकरणात भगतसिंह, राजगुरु आणि सुखदेव यांना १९३१ साली फाशीची शिक्षा देण्यात आली. हा दिवस देशात शहीद दिन म्हणून साजरा केला जातो. त्यांच्या बलिदानामुळे स्वातंत्र्य चळवळीला नवी दिशा मिळाली अशी माहिती त्यांनी आपल्या मनोगतातून सांगितली. स्वयंसेवक कु. ऋतुजा मोरे आणि कु. श्रुती काळे यांनी शहिदांच्या प्रेरणादायी कार्याची माहिती दिली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संत मुक्ताई शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे वार्षिक आंतरवर्गीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

**दि. १२ मार्च, २०२६.** संत मुक्ताई शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे वार्षिक आंतरवर्गीय क्रीडा स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धांचे आयोजन महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता तथा विद्यार्थी परिषद अध्यक्ष डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या क्रीडा स्पर्धांमध्ये क्रिकेट, कबड्डी, खो–खो, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, बुद्धिबळ, टेबल टेनिस तसेच ॲथलेटिक्स अशा विविध खेळांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी या सर्व स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग



नोंदवून खेळाडूवृत्तीचे उत्तम दर्शन घडविले. उद्घाटनप्रसंगी झालेल्या कार्यक्रमात बोलताना डॉ. संदीप पाटील यांनी सांगितले की, खेळांना आपल्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळतो. क्रीडा ही केवळ स्पर्धा नसून ती शारीरिक व मानसिक विकासाचे प्रभावी साधन आहे. यामुळे शिस्त, संघभावना, नेतृत्व आणि सहनशीलता यांचा विकास होतो. तसेच विद्यार्थ्यांमध्ये खेळाविषयी आवड निर्माण करून आरोग्यदायी स्पर्धा आणि खेळाडूवृत्ती विकसित करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी तथा विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष डॉ. गणेश देशमुख, सहाय्यक कुलसचिव श्री. प्रशांत नागे, शारीरिक शिक्षण निर्देशक डॉ. रियाज शेख, सहाय्यक नियंत्रक श्री. सुशांत उके यांची उपस्थिती होती. तसेच डॉ. कुशल ढाके, डॉ. सागर बंड, डॉ. सागर पाटील, डॉ. मनीषा पालवे, डॉ. ऐश्वर्या पाटील, डॉ. आबासाहेब पराडे, श्री. भूषण जगताप व इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शारीरिक शिक्षण निर्देशक डॉ. रियाज शेख यांनी केले.

## संत मुक्ताई शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे मुक्तांगण २०२६ वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न






**दि. १७ मार्च २०२६.** संत मुक्ताई शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे मुक्तांगण २०२६ या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता तथा विद्यार्थी परिषद अध्यक्ष डॉ. संदीप पाटील होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जळगाव जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. कुरबान तडवी उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर विद्यार्थी कल्याण अधिकारी तथा विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष डॉ. गणेश देशमुख, सहाय्यक कुलसचिव श्री. प्रशांत नागे, शारीरिक शिक्षण निर्देशक डॉ. रियाज शेख, सहाय्यक नियंत्रक श्री. सुशांत उके तसेच विद्यार्थी परिषद सभापती चि. आकाश पाटील उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. संदीप पाटील यांनी विविध स्पर्धांतील पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांचे मनोबल वाढवले व भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी वर्तमानात जगण्याचा सल्ला देत आपले ध्येय निश्चित

करून त्यानुसार वाटचाल करण्याचे आवाहन केले. पालकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करावेत व जीवनातील प्रत्येक भूमिका उत्तम प्रकारे पार पाडावी, असेही त्यांनी सांगितले. प्रमुख पाहुणे श्री. कुरबान तडवी यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी करण्याचा सल्ला दिला. तसेच कृषि पदवीनंतर उपलब्ध असलेल्या विविध रोजगार संधींबाबत मार्गदर्शन केले. विजय–पराजय हा खेळाचा अविभाज्य भाग असल्याचे सांगून विद्यार्थ्यांनी अपयशाने खचून न जाता पुढील वर्षी अधिक चांगली तयारी करून सहभाग घ्यावा, असे त्यांनी आवर्जून नमूद केले. या प्रसंगी शैक्षणिक, क्रीडा, राष्ट्रीय सेवा योजना तसेच विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. तृतीय वर्षाचा विद्यार्थी आकाश पाटील यास यंदाचा उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार प्रदान करण्यात आला. पारितोषिक वितरणानंतर विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन, नाट्य आदी सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे आपली कलागुणांची प्रभावी मांडणी केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शारीरिक शिक्षण निर्देशक डॉ. रियाज शेख यांनी केले. विद्यार्थी परिषद सभापती चि. आकाश पाटील यांनी परिषदेमार्फत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा अहवाल सादर केला. यानंतर विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. गणेश देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास श्रीमती कलंत्री, डॉ. कुशल ढाके, डॉ. सागर बंड, डॉ. सागर पाटील, डॉ. मनीषा पालवे, डॉ. ऐश्वर्या पाटील, डॉ. आबासाहेब पराडे, श्री. भूषण जगताप तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कौस्तुभ होनमाने यांनी तर आभार प्रदर्शन सागर बंड यांनी केले.

## कृषि महाविद्यालय, धुळे येथे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न







**दि. १३ मार्च, २०२६.** कृषि महाविद्यालय, धुळे येथे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी. एम. इल्हे होते. याप्रसंगी या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध व्याख्याते आणि युवा प्रबोधनकार श्री. गणेश शिंदे उपस्थित होते. यावेळी डॉ. राहुल देसले, श्री. राजाराम महाले, प्रा. जितेंद्र सूर्यवंशी, डॉ. विकास पवार व डॉ. सुनील पाटील उपस्थित होते. यावेळी श्री. गणेश शिंदे यांनी तरुणांना करिअरमध्ये यशस्वी होण्यासाठी आणि सामाजिक जबाबदाऱ्या समजून घेण्यासाठी मार्गदर्शन केले. विशेषतः  विद्यार्थिनींना आत्मनिर्भर होण्याचा संदेश दिला. यावेळी मुलींना उद्देशून ते म्हणाले की मुलींनो, स्वतःच्या पायावर उभे राहा आणि आपले भविष्य स्वतः घडवा. शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करून त्यांनी विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवण्याचे आवाहन केले. यावेळी शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके व बक्षिसे देऊन गौरवण्यात आले. डॉ. राहुल देसले यांनी स्वागत व प्रास्तावित केले. यावेळी वर्ष २०२५–२६ च्या वार्षिक अहवालाचे वाचन करण्यात आले आणि मृदगंध या स्मरणिकेचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. विकास पवार यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत मौजे घुंगुर येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन व निविष्ठा वाटप कार्यक्रम संपन्न

**दि. २५ मार्च, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत असलेल्या विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, जि. कोल्हापूर येथील अखिल भारतीय समन्वित मका संशोधन केंद्र व भारतीय मका संशोधन संस्था, लूधियाना यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत शेतकऱ्यांना मार्गदर्शन व निविष्ठा वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी घुंगुर गावच्या सरपंच सौ.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
मफुकृवि ई वार्ता
मार्च २०२६

वर्ष :६, अंक क्रं. : ६३, मार्च, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी





शुभांगी कांबळे होत्या. यावेळी सहयोगी संशोधन संचालक डॉ. सुनील कराड, मका संशोधन केंद्राचे डॉ. सुहास भिंगारदेवे, ग्राम महसूल अधिकारी सौ. सुवर्णा कराड, ग्रामसेवक श्री. किशोर लगारे व श्री. शरद कांबळे उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. सुनील कराड म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठातील मका शास्त्रज्ञ संशोधन करून आपल्या बांधापर्यंत पोहोचण्याचे कार्य करीत आहेत. मक्याचे वाढते क्षेत्र, कारखानदारीमध्ये मक्याचा वाढता वापर यामुळे मका या पिकास अनन्यसाधारण महत्त्व आले आहे. मक्याच्या अधिक उत्पादनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरावी. विद्यापीठाने विकसित केलेले तंत्रज्ञान व विद्यापीठ निर्मित जैविक खतांचा वापर करावा तसेच शिफारशीत खतमात्रा यांचा वापर केल्यास निश्चितपणे उत्पादन वाढेल. याप्रसंगी सौ शुभांगी कांबळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अनुसूचित जाती समूहातील शेतकरी व महिला शेतकरी यांना महात्मा फुले कृषि विद्यापीठांमध्ये तयार केलेल्या फुले मायक्रोन्यूट्रियंट, मका सोलनी यंत्र व मेटारायझीम इ. निविष्ठांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. सुहास भिंगारदेवे यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये कार्यक्रमाचा उद्देश विशद करून मका संशोधन केंद्रामध्ये सुरू असलेल्या संशोधन व विस्तार कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. सागर शेळके यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. शरद रावण व श्री. विघ्नेश मोहिते यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी परिसरातील अनुसूचित जाती समूहातील शेतकरी व महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, नंदुरबार येथे अळिंबी लागवड तंत्रज्ञानावर एक दिवसीय प्रशिक्षण संपन्न






**दि. २४ मार्च, २०२६.** कृषि महाविद्यालय, नंदुरबार येथे शाश्वत उपजीविकेसाठी अळिंबी लागवड तंत्रज्ञान या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. यु. बी. होले यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या नेतृत्वाखाली आणि अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी डॉ. यू.बी. होले यांनी अळिंबीवरील कीड आणि त्याचे नियंत्रण याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. संदीप वाघ यांनी

शास्त्रोक्त अळिंबी उत्पादनाबाबत माहिती दिली. डॉ. दिनेश सूर्यवंशी यांनी अळिंबी उत्पादनाचे बाजार मूल्य, आहारातील महत्त्व आणि रोजगाराच्या संधीबाबत माहिती दिली. प्रा. सपकाळ यांनी अळिंबीवरील रोग आणि उपाय यावर मार्गदर्शन केले. प्रा. राजपूत यांनी अळिंबी काढणी आणि साठवणुकीबाबत मार्गदर्शन केले. डॉ. बिरारी यांनी ऑनलाइन माध्यमातून अळिंबी काढणीनंतरच्या प्रक्रियेबद्दल सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दिनेश सूर्यवंशी यांनी तर आभार डॉ. संदीप वाघ यांनी मानले. या प्रशिक्षण वर्गासाठी ४५ प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदवला.

## कृषि महाविद्यालय, पुणे येथे जागतिक हवामान दिन साजरा






**दि. २३ मार्च, २०२६.** कृषि महाविद्यालय, पुणे येथील कृषि हवामानशास्त्र विभाग येथे जागतिक हवामान दिन साजरा करण्यात आला. यावेळी विभागप्रमुख व संचालक (सीएएएफटी) डॉ. एस. बी. बागडे यांनी या जागतिक हवामान दिनाच्या आजचे निरीक्षण उद्याचे संरक्षण ही संकल्पना असल्याचे सांगितले व त्याविषयी आपले विचार मांडले. ॲग्रो ओटा टेक्नॉलॉजी संस्थापक श्री. केशव आर. गुंजाळ यांनी स्वागत केले व कृषि हवामानशास्त्र आणि उदयन्मुख तंत्रज्ञानाच्या भविष्यातील व्याप्तीवर प्रकाश टाकणारे अभ्यासपूर्ण भाषण केले. या कार्यक्रमासाठी कृषि महाविद्यालयातील शास्त्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ग्रामीण कृषि महोत्सव सेवा प्रकल्पांतर्गत मौजे नायगाव येथे शेतकरी जागरूकता कार्यक्रम संपन्न





**दि. २६ मार्च, २०२६.** कृषि महाविद्यालय, पुणे येथील कृषि हवामानशास्त्र विभाग व भारत हवामान विभाग, शिवाजीनगर, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मौ. नायगाव, ता. पुरंदर, जि. पुणे येथे शेतकरी जागरूकता कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालय, पुणेचे माजी सहयोगी अधिष्ठाता डॉ. दशरथ ठवाळ हे होते. याप्रसंगी श्री सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष श्री. प्रवीण चोपडा,

कृषि हवामानशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. व्ही. एम. लोंढे, शिवाजीनगर येथील भारत हवामान विभागाचे श्री. महेंद्र चौधरी व मृदा शास्त्रज्ञ डॉ. बी. एस. कदम उपस्थित होते.

यावेळी डॉ. दशरथ ठवाळ यांनी हवामान बदल व शेतीवर होणारा त्याचा परिणाम, ऊस पीक व्यवस्थापन, ऊस पाचट कंपोस्ट खत व्यवस्थापन, अंजीर बाग व्यवस्थापन याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. डॉ. व्ही. एम. लोंढे यांनी ग्रामीण कृषि मौसम सेवा प्रकल्प तसेच या प्रकल्पाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. श्री. महेंद्र चौधरी यांनी आय.एम.डी. जिल्हा आणि तालुकास्तरावर पाऊस, तापमान, सापेक्ष आद्रता, ढगांचे आच्छादन, वाऱ्याचा वेग आणि दिशा अशा अनेक हवामान शास्त्रीय निकषांबद्दल पाच दिवसांचा म्हणजेच मध्यम कालावधीचा हवामान अंदाज कशाप्रकारे पुरवतात व हे अंदाज शेतकरी बांधवांनी कसे मिळवायचे याबद्दल सविस्तर माहिती दिली. डॉ. बी. एस. कदम यांनी पीक उत्पादनामध्ये जमिनीचे आरोग्य व त्याचे महत्त्व, जमिनीतील सेंद्रिय घटकांचे महत्त्व, रासायनिक खतांचा योग्य प्रमाणात वापर, जिवाणू खतांचा वापर व स्फुरद विरघळविणारे जिवाणू याबाबत विस्तृत मार्गदर्शन केले. श्री. प्रवीण चोपडा यांनी सेंद्रिय शेतीतील स्वतःचे अनुभव कथन केले. कृषि हवामानशास्त्र विभागातील संशोधन सहयोगी श्री. सुहास जाधव यांनी भारत हवामान विभाग व भारतीय कृषि अनुसंधान परिषदेने पर्जन्य पूर्वानूमान व कृषि सल्ल्याकरिता विकसित केलेल्या मेघदूत ॲपबद्दलची तसेच भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्था व भारतीय कृषि अनुसंधान परिषदेने विज कोसळण्याचा अचूक अंदाज वर्तविण्यासाठी विकसित केलेल्या दामिनी ॲपची माहिती दिली. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमादरम्यान उपस्थित शेतकऱ्यांना महात्मा फुले कृषि विद्यापीठाची कृषिदर्शनी व इतर कृषि निविष्ठांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. सुहास जाधव यांनी केले. सदरील शेतकरी मेळाव्यासाठी मौजे नायगावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**प्रकाशक** : **डॉ. गोरक्ष ससाणे**
संचालक, विस्तार शिक्षण

**प्रमुख संपादक** : **डॉ. सचिन सदाफळ**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र

**सहसंपादक** : **श्री. सुनिल राजमाने**
कनिष्ठ संशोधन सहाय्यक, प्रसारण केंद्र

**डिझाईनर** : **श्री. प्रदिप कोळपकर**
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
**श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक-नि-टंकलेखक, प्रसारण केंद्र

**मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २९५०/२०२६**